**सामाजिक न्याय, विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण, महिला व बालविकास आणि आदिवासी विकास विभाग या विभागांतर्गत स्वयंसेवी संस्थांमार्फत चालविण्यात येत असलेल्या अनुदानित संस्थांमधील प्रवेशितांना देण्यात येणारे दरडोई परिपोषण अनुदानात वाढ करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग**
**शासन निर्णय क्रमांक:- बीसीएच-२०१८/प्र.क्र. ७९/शिक्षण-२**
मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२
दिनांक:- ०३ मार्च, २०१९

वाचा-
१. शासन निर्णय समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व पर्यटन विभाग क्र. व्हीजेडब्ल्यू-१०९०/प्र.क्र.२२/प्रस्ताव-१/मावक-६, दि. २४ सप्टेंबर,१९९१
२. शासन निर्णय समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व पर्यटन विभाग क्र व्हीजेडब्लयू- १०२०/प्र.क्र.२२/प्रस्ताव/मावक-६, दि. ९ ऑक्टोबर, १९९१
३. शासन निर्णय समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग क्र. व्हीएएस-१०९४/प्र.क्र.१७६/मावक-६, दि.२५ जुलै, १९९६
४. शासन निर्णय समाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व विशेष सहाय्य विभाग क्र. विभशा-२००१/प्र.क्र.५९/मावक-६, दि.२० नोव्हेंबर, २००२
५. शासन निर्णय सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग क्र. विभाशा-२००६/प्र.क्र.११५/ मावक-६, दि. ९.२.२००७
६. शासन निर्णय सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग क्र. विभशा- २००६/प्र.क्र.११५/ मावक-६, दि.२७.०५.२००८
७. शासन निर्णय सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग क्र. विभशा-२०१०/प्र.क्र. ६/विजाभज-२/दि. २९ डिसेंबर, २०११
८. शासन निर्णय सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग क्र. विभशा- २०१०/प्र.क्र.०६/ विजाभज-२ , दि.१ मार्च,२०१६.

प्रस्तावना-

स्वयंसेवी संस्थामार्फत चालविण्यात येणाऱ्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण विभाग, महिला बालविकास विभाग तसेच आदिवासी विकास विभाग या विभागाच्या नियत्रंणाखालील अनुदानित संस्थांमधील निवासी विद्यार्थ्यांसाठी देण्यात येणाऱ्या परिपोषण अनुदानात रू. ६३०/- वरून रू. ९००/- इतकी वाढ करण्यासंदर्भात उपरोक्त वाचा येथील शासन निर्णय दि. २९ डिसेंबर, २०११ अन्वये निर्णय घेण्यात आलेला होता. तसेच महिला व बालविकास विभागांतर्गत एड्स ग्रस्त व मंतीमंद निवासी विदयार्थ्यांकरीता रु. ८२५ वरुन रू.९९०/- आणि सामाजिक न्याय विभागाच्या मतीमंद निवासी विदयार्थ्यांसाठी रू. ६३०/- वरून रू.९९०/- इतकी परिपोषण अनुदानात वाढ करण्याचा निर्णय याच शासन निर्णयान्वये घेण्यात आलेला होता.

गेल्या काही वर्षापासून महागाई पर्यायाने ग्राहक मूल्य निर्देशांकामध्ये (इंडेक्स) वाढ झाल्यामुळे निवासी विदयार्थ्यांना परिपोंषण आहाराचे दर वाढवून देण्यासंबंधात सेवाभागी संस्थांकडून मोठया प्रमाणावर मागणी होत होती. या मागणीचा सांगोपांग विचार करून आणि संस्थांना देण्यात यावयाच्या अनुदानात एकसुत्रता राहावी यासाठी शासनाने सामाजिक न्याय विभाग, महिला व बाल विकास विभाग, अदिवासी विकास विभाग तसेच विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण विभाग या विभागांतर्गत स्वयंसेवी संस्थामार्फत चालविण्यात येत असलेल्या अनुदानित संस्थांमधील प्रवेशितांना देण्यात येणाऱ्या परिपोषण अनुदानात वाढ करण्यासंदर्भात शासनास शिफारस करण्यासाठी मा. मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली संदर्भीय दि.१ मार्च,२०१६ च्या शासन निर्णयान्वये अभ्यास गटाची स्थापना करण्यात आलेली होती.

मा.मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखालील अभ्यासगटाने परिपोषण आहार अनुदानात वाढ करण्याबाबत केलेल्या शिफारशीनुसार प्रस्ताव मंत्रीमंडळापुढे मान्यतेसाठी सादर करण्यात आला होता. त्यानुषंगाने मंत्रीमंडळाने दि.२०.०२.२०१९ रोजीच्या बैठकीमध्ये दिलेल्या मान्यतेनुसार सामाजिक न्याय, अदिवासी विकास आणि महिला व बालविकास विभाग तसेच विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण विभाग या विभागांतर्गत स्वयंसेवी संस्थांमार्फत चालविण्यात येत असलेल्या अनुदानित संस्थांमधील प्रवेशितांना देण्यात येणाऱ्या दरडोई परिरक्षण (परिपोषण) अनुदानात वाढ करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

**शासन निर्णय :-**

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, अदिवासी विकास विभाग, महिला व बालविकास तसेच विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण विभाग या विभागांतर्गत स्वयंसेवी संस्थांमार्फत चालविण्यात येत असलेल्या शासन मान्यता प्राप्त अनुदानित संस्थांमधील निवासी विदयार्थ्यांसाठी रु ९००/- वरुन दरमहा दरडोई रु.१५००/- असा परिपोषण दर दि. १ फेब्रुवारी २०१९ पासून लागु करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे. सदर परिपोषण अनुदान खालील संस्थांना लागु राहिल :-

| अ.क्र. | संस्थेचा प्रकार |
|---|---|
| १ | विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागासवर्ग प्रवर्ग कल्याण या विभागाच्या विमुक्त जाती, भटक्या जमातीच्या अनुदानित प्राथमिक/माध्यमिक/उच्च माध्यमिक आश्रमशाळा. |
| २ | उसतोड कामगारांच्या मुलांसाठी असलेल्या अनुदानित प्राथमिक आश्रमशाळा (विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागासवर्ग प्रवर्ग कल्याण विभाग) |
| ३ | अनुसूचित जातीच्या अनुदानित प्राथमिक/माध्यमिक आश्रमशाळा |
| ४ | मागासवर्गीय मुलामुलींची अनुदानित वसतीगृहे |
| ५ | अपंगाच्या अनुदानित विशेष शाळा/कर्मशाळा |
| ६ | अस्थिव्यंग मुलांसाठी अनुदानित निवासी शाळा |
| ७ | बहिरे व मुके यांच्याकरिता असलेल्या अनुदानित निवासी शाळा |
| ८ | अंध मुलांसाठीच्या अनुदानित निवासी शाळा |
| ९ | अनुदानित वृध्दाश्रम |
| १० | आदिवासी विभागाअंतर्गत स्वयंसेवी संस्थांमार्फत चालविण्यात येणाऱ्या अनुदानित आश्रमशाळा |
| ११ | महिला व बाल विकास विभागाअंतर्गत स्वयंसेवी संस्थांमार्फत चालविण्यात येणाऱ्या अनुदानित संस्था (एड्सग्रस्त व मतीमंद वगळून) |

२. तसेच सामाजिक न्याय विभागांतर्गत स्वयंसेवी संस्थांमार्फत चालविण्यात येत असलेल्या शासन मान्यता प्राप्त अनुदानित संस्थामधील मतीमंद निवासी विद्यार्थी व मतीमंद बालगृहातील प्रवेशितांचे तसेच महिला व बालविकास विभागांतर्गत स्वयंसेवी संस्थांमार्फत चालविण्यात येत असलेल्या शासन मान्यता प्राप्त अनुदानित संस्थामधील एडसग्रस्त व मतीमंद निवासी विदयार्थ्यांचे परिपोषण रू. ९९०/- वरून दरमहा दरडोई रू. १६५०/--इतके परिपोषण अनुदान दि.१ फेब्रुवारी, २०१९ पासून लागू करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

३. सदर परिपोषण अनुदानात वाढ केल्यामुळे देय होणारे अनुदान वितरीत करण्यापूर्वी वरील सर्व आश्रमशाळा व वसतीगृहांमध्ये/संस्थांमध्ये निवासी विदयार्थ्याची संख्या योग्य आहे किंवा कसे, पटावर दर्शविण्यात आलेले निवासी विदयार्थी या आश्रमशाळा/ वसतीगृह वा संस्थांमध्ये नेहमी उपस्थित असतात किंवा कसे खात्री करावी तदनंतरच परिपोषण अनुदान वितरित करण्यात यावे.

४. विद्यार्थ्यांना पुरवावयाच्या भोजनाचा तक्ता (Diet Chart) संस्थेने वस्तीगृहाच्या बोर्डावर लावावा.

५ या संस्थेतील प्रवेशीतांना आवश्यक सुविधा तसेच भोजन तक्त्याप्रमाणे (Diet Char) प्रमाणे भोजन पुरवितात किंवा कसे यांची तपासणी संबधीत विभागाच्या विद्यार्थी पालक वा अन्य समिती गठीत केली असल्यास त्या समितीने वेळोवेळी तपासावी .

६. प्रस्तुत संस्था या समाजिक सेवा म्हणुन हे कार्य करीत असून, शासन त्यांना सहाय्य म्हणुन सहायक अनुदान देते सबब या संस्थांनी स्वत:च्या उत्पन्नाच्या स्त्रोतांमधून या अनुदानाशिवाय येणारा खर्च भागवून प्रवेशित/ विदयार्थ्यांना दर्जेदार भोजनासह आवश्यक असलेल्या सर्व सोयी-सुविधा पुरविणे आवश्यक आहे.

**या परिपोषण अनुदान वाढीचा खर्च खालील प्रमाणे भागविण्यात यावा.**

१. सामाजिक न्याय विभागाच्या अधिपत्याखालील मागासवर्गीय विदयार्थ्यांची अनुदानित वसतीगृहे, अनुसूचित जातीच्या मुला-मुलींच्या प्राथमिक/माध्यमिक अनुदानित आश्रमशाळा यामधील विदयार्थी/प्रवेशीतांच्या परिपोषण अनुदान वाढीचा खर्च सामाजिक न्याय विभागाच्या विशेष घटक योजनेच्या निधीमधुन भागविण्यात यावा. तर सामाजिक न्याय विभागाच्या अधिपत्याखालील अपंगाच्या अनुदानित विशेषशाळां/कार्यशाळा, मंतीमंदाच्या अनुदानित विशेष शाळां/कार्यशाळा, मतीमंद बालगृह तसेच सामाजिक न्याय विभागांतर्गत कार्यरत अनुदानित सर्वसाधारण वृध्दाश्रम या संस्थामधील प्रवेशितांच्या परिपोषण अनुदानाचा खर्च सामाजिक न्याय विभागाच्या सर्वसाधारण निधीमधुन भागविण्यात यावा.

२. विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण विभागाच्या अनुदानीत आश्रमशाळा तसेच उसतोड कामगारांच्या मुलांसाठी असलेल्या अनुदानित प्राथमिक आश्रमशाळांच्या परिपोषण अनुदानाचा खर्च विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण विभागाने त्यांच्या तरतूदीतून भागवावा.

३. अदिवासी विकास विभागाच्या अनुदानीत आश्रम शाळांच्या परिपोषण अनुदानाचा खर्च अदिवासी विकास विभागाने त्यांच्या तरतूदीतून भागवावा.

४. महिला व बाल विकास विभागाच्या अनुदानीत संस्था तसेच त्या विभागांतर्गत एडसग्रस्त व मतीमंद निवासी विदयार्थ्यांसाठीच्या अनुदानित संस्था यांच्या परिपोषण अनुदानाचा खर्च महिला व बाल विकास विभागाने त्यांच्या तरतूदीतून भागवावा.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २०१९०३०५१४२९०९९५२२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने,

Dinesh Tarachand Waghmare

Digitally signed by Dinesh Tarachand Waghmare
DN: c=IN, o=Pimpri Chinchwad Municipal Corporation, ou=Urban Development, cn=Dinesh Tarachand Waghmare, serialNumber=1942d0ab186ec53652803a0d79b1da0e280 62a9c6a1e9d31107d88e0d22da892, postalCode=411018, 2.5.4.20=c621f103cf6ece05f04c475bcfa12c8567127d9b54 4106f538d8b092a216bc3e, st=Maharashtra
Date: 2019.03.05 14:33:00 +05'30'

**( दिनेश वाघमारे )**
प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रत:-**

१. मा. मुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव
२. मा. मुख्य सचिव, मंत्रालय,मुंबई
३. मा. अति.मुख्य सचिव (नियोजन), मंत्रालय, मुंबई
४. मा. अति.मुख्य सचिव (वित्त) , मंत्रालय, मुंबई
५. मा. प्रधान सचिव,आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
६. मा. प्रधान सचिव,विजाभज,इमाव व विमाप्र कल्याण ,विभाग, मंत्रालय, मुंबई
७. मा. प्रधान सचिव, महिला बालविकास विकास विभाग , मंत्रालय, मुंबई

८. आयुक्त,समाजकल्याण,पुणे.
९. आयुक्त, अपंग कल्याण,पुणे
१०. आयुक्त,आदिवासी विकास ,नाशिक
१०. आयुक्त, महिला बालविकास विकास, पुणे
११. संचालक, विजाभज संचालनालय, पुणे
१२. सर्व प्रादेशिक उपायुक्त, समाजकल्याण,
१३. सर्व जिल्हा समाजकल्याण अधिकारी, जिल्हा परिषद/सर्व सहायक आयुक्त, समाजकल्याण,
१४. सर्व प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी
१५. शिक्षण-२ संग्रहार्थ.